# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** श्रीगोंदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0167 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/02/2025 06:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 27/02/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/02/2025
**Time From (वेळेपासून):** 16:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/02/2025 **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/02/2025 06:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, .5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीगोंदा पोलीस स्टेशन

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नागनाथ बाळु हिरडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हिरडेमळा श्रीगोंदा,श्रीगोंदा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हिरडेमळा श्रीगोंदा,श्रीगोंदा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9623631649

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष सुधाकर फलके | | | 1. शिवनगर सावेडी,तोफखाना, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद श्रीगोंदा,जिल्हा-अहिल्यानगर

दि.28/02/2025.

मी नागनाथ बाळु हिरडे, वय-27 वर्षे , व्यवसाय- शेती, रा. हिरडेमळा, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर, मो. नं. 9623631649.

व

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी दि.27/05/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना फोन करून मला एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला श्रीगोंदा येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार दि.27/02/2025 रोजी दुपारी 03.00 वाजेचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर चे अधिकारी व कर्मचारी हे श्रीगोंदा येथे मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोनि आल्हाट यांनी माझा परिचय करुन घेतला तसेच आम्हाला त्यांचा व त्यांचे सोबतचे कर्मचारी, दोन शासकीय पंचाचा परिचय करुन दिला.

त्यानंतर मी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरुन शासकीय वाहनात बसलो व दोन शासकिय पंचासमक्ष तक्रार सांगितली की," दिनांक 08/02/2025 रोजी माझ्या हिरडेमळा येथील शेताजवळील सार्वजनिक रस्त्यावरून आमचे गावातील अनिल हिरडे व त्यांचे नातेवाईकांसोबत माझे व माझ्या नातेवाईकांचे वाद झाले होते त्योवळी अनिल हिरडे यांनी माझे तसेच माझे इतर 13 नातेवाईक यांचेविरोधात श्रीगोंदा पोलीस स्टेषन येथे गु.रजि.नं. 131/2025,भारतीय न्याय संहिता कलम 118(1), 115(2), 352, 351(2), 324(4), 189(2), 191 (1),191(2),190 प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे तसेच माझी पत्नी सायली नागनाथ हिरडे हिने दिलेल्या तक्रारीवरून अनिल हिरडे व त्यांचे नातेवाईकांचे विरोधात श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.132/2025, भारतीय न्याय संहिता कलम 189(2), 191(2), 191(3),118(1),74,115(2), 352,351(2), प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे व वरील दोन्ही गुन्हयांचा तपास श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार संतोष फलके हे करीत आहेत.दिनांक 25/02/2025 रोजी मी पोलीस हवालदार फलके यांची श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे भेट घेतली होती त्यावेळी त्यांनी मला गुन्हयाचे तपासामध्ये नोटीस देण्याकरीता तसेच आमचे 14 जणांवर प्रतिबंधक कारवाई करायची असल्याने आम्हाला दिनांक 27/02/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता श्रीगोंदा पोलीस स्टेषनमध्ये जामीनदारांसह हजर राहण्याकरीता सांगितले त्याप्रमाणे आज दिनांक 27/02/2025 रोजी मी व सोबत गुन्हा दाखल असलेले माझे 13 नातेवाईक जामीनदारासह श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गेलो त्यावेळी मी पोलीस हवालदार फलके यांची भेट घेतली असता पोलीस हवालदार फलके यांनी माझ्याकडे गुन्हयाचे तपासात मदत करण्याकरीता आमचे 14 जणांचे मिळुन 20,000/- रूपये मागितले त्यावेळी माझे लक्षात आले कि,पोलीस हवालदार फलके हे माझे तसेच माझे इतर 13 नातेवाईकांविराधोत दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासात मदत करण्याकरीता लाचेची मागणी करत आहे. तरी मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.वगैरे मजकुरची तक्रार सांगितली." मी सांगितलेली तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास पोनि.आल्हाट यांनी मला सांगितले. त्यावरून मी माझ्या स्वहस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन दिली त्यावर मी, दोन्ही पंचांनी व पोनि आल्हाट यांनी स्वाक्षरी केली..

त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन लोकसेवक फलके यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत मला व पंचांना माहिती समजावून सांगितली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर

मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालुन,व्हाईस रेकॉर्डर चालु करून,त्या मेमरीकार्ड मध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट,दोन्ही पंच व मी निवेदन केले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी मला,पंच नं.1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने रवाना केले.त्याप्रमाणे आम्ही लोकसेवक फलके यांची भेट घेण्याकरीता श्रीगोंदा पोलीस स्टेषन येथे 15/50 वा.चे सुमारास रवाना झालो.

मी व पंच नं. 1 असे श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गेल्यानंतर लोकसेवक फलके हे बसत असलेल्या कक्षाचे येथे गेल्यानंतर सदर कक्षाला कुलुप लावलेले होते त्यावेळी मी लोकसेवक फलके यांना माझ्या 9545860503 या मोबाईल क्रमांकावरुन लोकसेवक फलके यांच्या 9923092458 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर मी सोबत पंच नं.1 असे बराच वेळ श्रीगोंदा पोलीस स्टेषन येथे थांबल्यानंतर कोणाला संशय येवु नये म्हणुन आम्ही पुन्हा सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 16.35 वा.चे सुमारास परत आलो.आम्ही परत आल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी मला तसेच पंच नं.1 यांना घडले हकिगतीबाबत विचारले असता आम्ही लोकसेवक फलके यांची भेट झाली नसलेबाबत त्यांना सांगितले त्यानंतर आम्ही सुरक्षीत ठिकाणी थांबलो असताना,मला लोकसेवक फलके यांच्या 9923092458 या मोबाईल नंबर वरून माझ्या 9545860503 या वर 16/39 वा.फोन आला,त्यावेळी त्यांनी मला पोलीस स्टेशनला आलो नाही म्हणुन विचारणा केली व जामीनदारांबाबत माहिती घेवुन मला उदया 09.00 वाजता पोलीस स्टेशनमध्ये येण्यास सांगितले असता मी.त्यांना सर्व पोलीस स्टेशनला आले असलेबाबत सांगितले असता त्यांनी दहा मिनिटांमध्ये पोलीस स्टेशन येत असलेबाबत सांगुन मला पोलीस स्टेशनमध्ये बोलावुन घेतले.त्यावेळी आमचे मोबाईल वर झालेले बोलणे रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डर करण्यात आले.त्यांनतर मला व पंच नं.01 यांना पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी योग्य त्या सुचना दिल्या,त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. त्यांनतर दुपारी 16/45 वा चे सुमारास पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी मला पंच नं.1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने रवाना केले,त्याप्रमाणे आम्ही लोकसेवक फलके यांची भेट घेण्याकरीता श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे रवाना झालो.त्यानंतर मी व पंच नं. 1 असे श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथील लोकसेवक फलके यांचे कक्षामध्ये गेलो असता तेथे म्हेत्रे पोलीस बसलेले होते त्यावेळी त्यांनी आम्हा 14 जणांना कक्षामध्ये बोलावुन घेतले व आमची प्रत्येकाची माहिती विचारु लागले त्यानंतर काहि वेळाने लोकसेवक फलके श्रीगोंदा पोलीस स्टेशनमध्ये आले त्यावेळी ते कक्षामध्ये आल्यानंतर त्यांनी आम्हाला प्रत्येकाला वय,मोबाईल क्रमांक,व्यवसाय इत्यादी माहिती विचारु लागले व त्यानंतर आमचे प्रत्यकाचे नावाने तयार केलेल्या भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम 35(3) प्रमाणे तयार केलेल्या नोटिसीवर आमच्या सहया व हाताच्या अंगठयाचे ठसे घेतले तसेच आमच्या प्रत्येकाच्या नावाने तयार केलेल्या समजपत्रांवर तसेच आम्ही दिलेल्या आधारकार्डचे झेरॉक्स प्रतींवर आमच्या सहया घेतल्यानंतर लोकसेवक फलके यांनी आमचे वर प्रतिबंधक कारवाई करणेकरीता म्हेत्रे पोलीसांसोबत आम्हाला तहसिल कार्यालय,श्रीगोंदा येथे पाठविले त्याप्रमाणे आम्ही म्हेत्रे पोलीसांसोबत तहसिल कार्यालय,श्रीगोंदा येथे गेलो तेथे गेल्यानंतर म्हेत्रे पोलीसांनी त्यांचेकडील प्रतिबंधक कारवाईचे रिपोर्ट तहसिल कार्यालयात दिल्यानंतर आम्हाला तसेच आमचे सोबत असलेल्या जामीनदारांना थांबण्याकरीता सांगितले त्यावेळी मी पंच नं.1 यांचेसह लोकसेवक फलके यांची भेट घेण्याकरीता पोलीस स्टेशन मध्ये आलो त्यावेळी आमचेसोबत माझा पुतण्या भरत हिरडे हा देखील आला होता त्यावेळी लोकसेवक फलके यांना भेटलो व साहेब जाऊ का असे म्हटलो असता लोकसेवक फालके म्हणाले लाज वाटते का तुला जावु का म्हणायला, खर्च मी करायचा का रे, त्यावर मी त्यांना सार्वजनिक सगळयांच आहे असे म्हणुन आता कसं करायचं, असे म्हणालो असता लोकसेवक फलके यांनी प्रत्येकी पाचशे रूपयांनी 7000/- रूपये घेवुन येण्यास सांगितले त्यावेळी मी त्यांना पाच सहा जणांचे नाही त्यावर लोकसेवक फलके म्हणाले आता जेवढे आहे तेवढे घेवुन ये बाकीचे उदया घेवुन ये असे म्हणाले, अशाप्रकारे लोकसेवक फलके यांनी आमचेविरोधात दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्याकरीता माझ्याकडे पंचासमक्ष आमचे 14 जणांचे प्रत्येकी पाचशे रूपये या प्रमाणे 7,000/- रूपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 18.23 वा.चे सुमारास परत आलो.त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यांनतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला तसेच पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले असता लोकसेवक फलके यांनी माझ्या तसेच माझ्या इतर 13 नातेवाईकांचे विरोधात दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासामध्ये मदत करण्यासाठी 7000/- रूपये

लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याबाबतची खात्री झाली.

त्यानंतर लोकसेवक फलके यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 7000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 14 भारतीय चलनी नोटा, अशी रक्कम हजर केली. पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पो.कॉ.गायकवाड यांनी करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर लाच रक्कम लोकसेवक फलके यांना देण्याकरीता माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली.पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी सापळा कारवाई बाबत मला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या.पोनि श्री. आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून माझ्या ताब्यात दिले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे माझ्या दुचाकी वाहनावर 18.54 वा.रवाना झालो व पोनि आल्हाट, पंच क्र. 2 व सापळा पथक असे षासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले,मी व पंच नं.1 असे श्रीगोंदा पोलीस स्टेषनचे गेटजवळ येवुन थांबलो.सापळा पथक आमचे पाठोपाठ आल्याची खात्री झाली.त्यावेळी मी व पंच नं.01 असे लोकसेवक फलके यांचे कक्षात गेलो.आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील कार्यालयाचे जवळ येवुन थांबले.त्यानंतर मी माझे शर्टाचे खिषामधील 7000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक फलके यांना देण्यासाठी त्याचेसमोर धरली असता, लोकसेवक फलके यांनी मी त्यांचेसमोर धरलेली लाच रक्कम 7000/- रूपये त्यांचे उजवे हाताने स्वीकारुन त्यांच्या शर्टच्या समोरील खिषात ठेवली. त्यावेळी ते म्हणाले पुर्ण आहे ना, त्यावेळी मी त्यांना म्हणालो पुर्ण आहे,मोजा ना, त्यावेळी ते राहु दे,असे म्हणाले त्यानंतर मी त्यांचे कक्षाचे बाहेर येवुन सापळा पथकास लोकसेवक फलके यांनी लाच स्वीकारल्याचा नियोजित इशारा केला त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व लोकसेवक फलके यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले.व पंच नं.02 करवी लोकसेवक फलके यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत केली.

त्यावेळी पोनि आल्हाट यांनी लोकसेवक फलके यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संतोश सुधाकर फलके,वय-40 वर्शे,पोलीस हवालदार,बक्कल नंबर 361,नेमणुक-श्रीगोंदा पोलीस स्टेषन,हल्ली रा.दिगंबर बडे यांचे फ्लॅट मध्ये भाडयाने,जकाते वस्ती,श्रीगोंदा,ता.श्रीगोंदा,जि.-अहिल्यानगर,मुळ रा.प्लॉट नंबर 13,शिवनगर, सावेडी,अहिल्यानगर असे सांगितले.त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला बाहेर थांबण्याचे सांगुन लोकसेवक फलके यांच्या आवश्यक त्या तपासण्या केल्या.त्यानंतर मला पोनि आल्

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

DNYANESHWAR BHAGWAN BHOSALE

**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): POBN67347

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला बाहेर थांबण्याचे सांगुन लोकसेवक फलके यांच्या आवश्यक त्या तपासण्या केल्या.त्यानंतर मला पोनि आल्हाट यांनी शासकीय विश्रामगृह, कुकडी पाटबंधारे विभाग,श्रीगोंदा येथे येण्यास सांगीतले व पोनि आल्हाट व त्यांचे सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक फलके यांना घेवुन शासकीय विश्रामगृह,कुकडी पाटबंधारे विभाग,श्रीगोंदा येथे आले व मला दिलेल्या सुचनाप्रमाणे मी माझ्या दुचाकी वाहनाने विश्रामगृह येथे आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.

तरी दि.२७/०२/२०२५ रोजी १६/४५ वा. ते १८/२३ वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक पोलीस हवालदार संतोष फलके यांनी श्रीगोंदा पोलीस स्टेशन,ता.श्रीगोंदा,जि.अहिल्यानगर येथे माझ्या तसेच माझ्या इतर १३ नातेवाईकांचे विरोधात श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी माझ्याकडे, पंचासमक्ष ७०००/— रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले,व सापळा कारवाई दरम्यान सदरची लाच रक्कम श्रीगोंदा पोलीस स्टेशनमधील त्यांचे कक्षामध्ये पंचासमक्ष स्विकारली म्हणुन लोकसेवक संतोष सुधाकर फलके,वय—४० वर्षे,पोलीस हवालदार,बक्कल नंबर ३६१,नेमणुक श्रीगोंदा पोलीस स्टेशन,ता.श्रीगोदा,जि.अहिल्यानगर यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

पोलीस ठाणे अंमलदार
श्रीगोंदा पोलीस स्टेशन,अहिल्यानगर

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Abhiradd

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
श्रीगोंदा पोलीस स्टेशन,अहिल्यानगर.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KIRAN BAJIRAO SHIN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14901000362KBSM800